RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ९५] बुधवार, जुलै २२, २०२६/आषाढ ३१, शके १९४८ [पृष्ठे ६, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ३१६**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जुलै २०२६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक कौविउ-२०२६/प्र.क्र. १५४/प्रशा-२.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संदर्भात सध्या अस्तित्वात असलेले नियम, आदेश आणि अनुदेश अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयातील कनिष्ठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट "क" आणि वरिष्ठ लिपिक, गट "क" या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :-

१. (१) या नियमांस कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयातील कनिष्ठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट "क" आणि वरिष्ठ लिपिक, गट "क" (सेवाप्रवेश) नियम, २०२६ असे म्हणावे.

(२) हे नियम, महाराष्ट्र शासनाच्या **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ, आयुक्तालयातील कनिष्ठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट "क" आणि वरिष्ठ लिपिक, गट "क" या पदांवर नियुक्ती करण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्त, असा आहे ;

(ख) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे ;

(ग) "आयुक्तालय" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय असा आहे ;

(घ) "पदवी" याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने घोषित केलेली समतुल्य अशी इतर कोणतीही अर्हता, असा आहे ;

(ङ) "विभाग" याचा अर्थ, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६६ अन्वये तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीस जोडलेल्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेला कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग असा आहे ;

(च) "पदोन्नतीसाठी पात्रता" याचा अर्थ, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेश यांमध्ये पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता असा आहे ;

(छ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे.

३. कनिष्ठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, गट "क" या पदावरील नियुक्ती एकतर ,-

(क) पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या आणि आयुक्तालयातील, वरिष्ठ लिपिक, गट "क", या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा असणाऱ्या, उक्त पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून सामायिक ज्येष्ठता यादीच्या अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ख) जे उमेदवार, पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :-

**(एक) वयोमर्यादा :-**

(एक) किमान वयोमर्यादा-उक्त पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार, अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षांपेक्षा कमी नसेल.

(दोन) कमाल वयोमर्यादा- त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार, अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी अडतीस वर्षांपेक्षा अधिक नसेल व राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षांपेक्षा अधिक नसेल.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता :-**

पदवी धारण केलेले

४. आयुक्तालयातील, वरिष्ठ लिपिक, गट "क" या पदावरील नियुक्ती एकतर ;

(क) पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या आणि आयुक्तालयातील, लिपिक टंकलेखक, गट "क", या पदावरील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित व अखंड सेवा असणाऱ्या, उक्त पद धारण करणाऱ्या व्यक्तींमधून सामायिक ज्येष्ठता यादीच्या अधीन राहून, ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल ; किंवा

(ख) जे उमेदवार, पुढील निकषांची पूर्तता करतात अशा, त्यासाठी घेतलेल्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे आयोगाने शिफारस केलेल्या उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :-

**(एक) वयोमर्यादा :-**

(एक) किमान वयोमर्यादा- उक्त पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार, अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षांपेक्षा कमी नसेल.

(दोन) कमाल वयोमर्यादा- त्या पदाच्या भरतीच्या जाहिरातीनुसार, अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी अडतीस वर्षांपेक्षा अधिक नसेल व राखीव प्रवर्गातील असलेल्या व्यक्तींसाठी त्रेचाळीस वर्षांपेक्षा अधिक नसेल.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता :-**

पदवी धारण केलेले

५. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्ती, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात येईल.

६. नियम ३ व ४ खालील एकूण मंजूर पदांकरिता, नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे, ७५:२५ या प्रमाणात करण्यात येईल.

७. (क) नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील.

(ख) नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. ती व्यक्ती, या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, वार्षिक वेतन वाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदांवरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

८. (क) नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीद्वारे नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, त्याबाबतीत शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार किंवा आदेशांनुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

(ख) नियम ३ व ४ मध्ये नमूद पदांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीने, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, याबाबतीत शासनाने वेळोवेळी विहित केलेले असे संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील, अन्यथा, ती व्यक्ती, ते प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतन वाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

९. (१) नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्तीसाठी शिफारस केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ च्या तरतुदींनुसार आणि याबाबत शासनाने वेळोवेळी केलेले अन्य कोणतेही नियम, आदेश किंवा कोणतेही संलेख यांनुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकाला दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर कायम राहण्यासाठी अपात्र असेल.

१०. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्रात कोणत्याही ठिकाणी बदलीसाठी पात्र असेल.

११. कोणत्याही शासकीय कर्मचाऱ्याच्या नियुक्तीनंतर, शासनाने वेळोवेळी केलेले कोणतेही नियम, आदेश किंवा निर्णय यांमध्ये शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्ती देखील अशा शासकीय कर्मचाऱ्यास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वैशाली सुळे,**
शासनाच्या उप सचिव.

## SKILLS, EMPLOYMENT, ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated 21st July 2026.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. SDE-2026/CR-154/Adm-2.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of the Junior Skill Development, Employment and Entrepreneurship Guidance Officer, Group 'C' and Senior Clerk, Group 'C' in the Commissionerate of Skill Development, Employment and Entrepreneurship under the administrative control of the Skills, Employment, Entrepreneurship and Innovation Department of the Government of Maharashtra, namely :—

**1.** (*1*) These rules may be called the Junior Skill Development, Employment and Entrepreneurship Guidance Officer, Group 'C' and Senior Clerk, Group 'C' in the Commissionerate of Skill Development, Employment and Entrepreneurship (Recruitment) Rules, 2026.

(*2*) These rules shall come into force on the date of publication of these rules in the *Maharashtra Government Gazette*.

**2.** In these rules, unless the context requires otherwise, —

(*a*) "Appointing Authority" means the Commissioner, Commissionerate of Skill Development, Employment and Entrepreneurship for appointing a candidate to the post of Junior Skill Development, Employment and Entrepreneurship Guidance Officer, Group 'C' and Senior Clerk, Group 'C' in the Commissionerate ;

(*b*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission ;

(*c*) "Commissionerate" means the Commissionerate of Skill Development, Employment and Entrepreneurship under the administrative control of the Skills, Employment, Entrepreneurship and Innovation Department of the Government of Maharashtra ;

(*d*) "Degree" means a degree of any discipline of a statutory university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(*e*) "Department" means the Skills, Employment, Entrepreneurship and Innovation Department specified in the First Schedule appended to the Maharashtra Government Rules of Business made under article 166 of the Constitution of India ;

(*f*) "Eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion in rules, resolutions or orders issued by the General Administration Department, from time to time ;

(*g*) "Government" means the Government of Maharashtra ;

**3.** The appointment to the post of Junior Skill Development, Employment and Entrepreneurship Guidance Officer, Group 'C' in the Commissionerate shall be made,—

(a) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority, as per seniority list subject to fitness from amongst the persons holding the post of Senior Clerk, Group 'C' in the Commissionerate, having not less than three years regular and continuous service on that post ; or

(b) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of result of Competitive Examination conducted therefor, who fulfills the following criteria, namely :—

(*i*) Age limit :—

(*A*) *Lower Age Limit*– Not less than eighteen years as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*B*) *Upper Age Limit*– Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the post ;

(*ii*) *Educational Qualification* :—Possess a degree.

**4.** The appointment to the post of Senior Clerk, Group 'C' in the Commissionerate shall be made,–

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority, as per seniority list subject to fitness from amongst the persons holding the post of Clerk-Typist, Group 'C' in the Commissionerate having not less than three years regular and continuous service on that post ; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of result of Competitive Examination conducted therefor, who fulfills the following criteria, namely :—

(*i*) Age limit :—

(*A*) Lower Age Limit — Not less than eighteen years as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*B*) Upper Age Limit — Not more than thirty-eight years of age for the persons not belonging to reserved categories and forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the post ;

(*ii*) Educational Qualification :– Possess a degree.

**5.** Appointment to the posts mentioned in rules 3 and 4 shall be made with the approval of Appointing Authority.

**6.** Appointment to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion and nomination shall be made in the ratio of 75:25, respectively, for the total number of sanctioned posts to be filled under rules 3 and 4.

**7.** (*a*) A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

(*b*) A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by nomination, shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examinations.

**8.** (*a*) A person to be appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate of Computer Operations before getting promoted to the said post.

(*b*) A person to be appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by nomination, shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate of Computer Operations, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possess the same.

**9.** (*1*) A person appointed to the posts mentioned in rules 3 and 4 by nomination, shall submit a declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in the Government service.

(*3*) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

**10.** A person appointed to the post mentioned in rules 3 and 4 shall be liable for transfer anywhere in Maharashtra.

**11.** The terms and conditions specified by the Government, subsequent to the appointment of any Government servant in any rules, orders or resolutions issued by the Government, from time to time, shall also be applicable to the Government servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VAISHALI SULE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.